सकाळ



पुणे : येथील पदवी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार करताना गायत्री केसरकर, अजय शिर्के, अनुपमा काटकर व इतर.

# सायबर गुन्हेगारी जागृती प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग

संकेश्वर, ता. ११ : निडसोशी येथील एसजेपीएन ट्रस्टच्या पदवी महाविद्यालयातील चार विद्यार्थी पुणे येथील क्लिक हिल फौंडेशनतर्फे आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यात संपदा शेंडे, ऐश्वर्या सपकाळे, निखिल सत्यनाईक, बाळेश यु, पवन हिरेमठ यांचा समावेश होता. त्यांना गायत्री केसरकर, अजय शिर्के, दीपू सिंह, अनुपमा काटकर आदी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. त्यांना प्राचार्य बसवराज हलभावी, प्रा. आनंद सोनार यांचे सहकार्य लाभले.

Belgaum, Belgaum-Today
12/07/2025 Page No. 6